**निवेदन**
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे.
करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८

साप्ताहिक

# संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : ०५ वा ■ सोमवार दि.२४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने - ०४

अंगणवाडीसेविका रेशमा पारधी... पान २ वर | छात्रों की गुंज कार्यक्रमाअंतर्गत... पान ३ वर | सावित्रीबाईंच्या विचारांची... पान ४ वर

## नगरसेवक अमोल बालवडकर आणि सुहास टिंगरे यांनी दिलेल्या ठरावाची चौकशी करून शून्य बजेट केले असते तर राष्ट्रवादीच्या विरोधाला कोणी जुमानले नसते पण हा विषय पुणेकरांनी लावून धरला आहे?

### भ्रष्टाचार करणाऱ्या लोकप्रतिनिधींना? रिल्सस्टार संतोष पंडित यांनी जाब विचारला पण त्याचे उत्तर अजून मिळाले नाही






**पुणे** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक अमोल बालवडकर यांच्या पाठोपाठ आता राष्ट्रवादीचे नगरसेवक सुहास टिंगरे यांच्या प्रभागातील तब्बल १२ कोटी रूपयांचा विकासनिधी शून्य करण्यात आला आहे. कोथरूड मतदारसंघातील विकासकामे आणि कारभाराबाबत नगरसेवक अमोल बालवडकर यांनी आक्रमक भूमिका घेत चौकशी व ऑडिटची मागणी केली होती. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सुहास टिंगरे यांनीही बालवडकर यांना अनुमोदन दिल्याचे वृत्त आहे. दरम्यान, भाजपच्या बहुमताच्या जोरावर आधी अमोल बालवडकर यांचा १२ कोटी रूपयांचा निधी रद्द करण्यात आला. त्यानंतर स्थायी समितीच्या निर्णयानुसार सुहास टिंगरे यांच्या प्रभागातील १२ कोटी रूपयांचा निधीही वॉर्ड क्रमांक ३ कडे वर्ग करण्यात आल्याचे समोर आले आहे. या निर्णयामुळे पुणे महापालिकेतील राजकीय वातावरण तापले असून, विकासनिधीच्या निर्णयामागे राजकीय दबाव अथवा सूडाचे राजकारण आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. तसे पाहता महाराष्ट्रातील सत्तेमध्ये एकूण ३ पक्षाचा समावेश आहे. यामध्ये भारतीय जनता पार्टीकडून मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस तर शिवसेना पक्षाकडून श्री.एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री आहेत. आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांचे प्रमुख म्हणून आता श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार याही उपमुख्यमंत्री पदावर आहेत. विशेष म्हणजे त्या पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री आहेत. आणि याच उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांना पुणे महापालिकेचे गटनेते गणेश बिडकर यांनी राष्ट्रवादीचे नगरसेवक अमोल बालवडकर आणि सुहास टिंगरे यांची तक्रार केली आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुनिल टिंगरे आणि पुणे महापालिकेतील विरोधी पक्षनेते ॲड.निलेश निकम यांच्यासह सर्व नगरसेवक आणि पदाधिकारी यांनी शून्य बजेटचा निषेध करण्यासाठी पुणे महापालिकेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर बसले होते. त्यानंतर त्यांनी पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन दिले होते. मुळात पुण्यातील भारतीय जनता पार्टीच्या सक्रिय नेत्यांनी निवडून आलेल्या नगरसेवकांच्या प्रभागातील विकासनिधी शून्य करून पुणे शहरातील प्रत्येक नागरिकासमोर कोथरूड मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे? असाच संदेश देण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. जर भ्रष्टाचार झाला नाही आणि तो सिध्द करून विकासनिधी शून्य केला असता; तर यांच्याविरोधाला कोणीही जुमानले नसते; पण सिध्द न करताच अमोल बालवडकर आणि सुहास टिंगरे यांच्या प्रभागाचा विकास निधी शून्य करून पुणे शहरातील नागरिकांचे लक्ष मोठ्या प्रमाणात कोथरूड मतदार संघात चंद्रकांतदादा पाटील यांनी केलेल्या कामाकडे लक्ष लागले आहे हे मात्र नक्की. कारण रिलस्टार संतोष पंडित हे सत्ताधारी यांच्या चुकीच्या कामाच्या विरोधात नेहमी बोलतात तर चांगले काम करणाऱ्यांचे कौतूक करायला ते मागे हटत नाही. तसेच ते पुणे शहरातील खड्डे, रस्ते, ड्रेनेज लाईन, चेंबर, वाहतूक कोंडी आणि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावत असणाऱ्या अडी-अडचणींना समाजमाध्यमावर दाखवून दखल घ्यायला लावतात. त्यांनी नुकत्याच काही दिवसापुर्वी कोथरूड विधानसभा मतदार संघाचे आमदार आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या भ्रष्टाचाराबाबत रिल्स बनवून उत्तर मागितले आहे. ते म्हणतात की, चंद्रकांतदादा पाटील यांनी कोथरूड विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र.१३ मध्ये म्हात्रे पुल, रिलायन्स मॉल शेजारी ओपन जिम बसविणे करिता ९,८०,७४४/- इतक्या किमतीची जिम बसवली आहे. आणि ही ओपन जिम २०२२ ते २०२३ या विकास कार्यक्रमामध्ये बसविण्यात आली आहे. तसेच या अगोदरचे आमदार श्रीमती मेधाताई कुलकर्णी यांनी त्यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून सन २०१७ ते २०१८ मध्ये राहुलनगर परिसरात कोथरूड येथे ओपन जिम त्याचपध्दतीने एकूण रक्कम ३,००,०००/- लाखात बसविली आहे. त्याचप्रमाणे शिवाजीनगर मतदार संघाचे आमदार श्री.सिध्दार्थ अनिल शिरोळे यांनी यांच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२४-२०२५ मध्ये शिवाजीनगर मतदार संघातील येरवडा येथील स्वर्गीय बिंदू माधव ठाकरे चौक ते डेक्कन कॉलेज रोड येथील पद पथावर ओपन जिम बसविणेकरिता १०,००,०००/- खर्ची करण्यात आले आहे. याच पध्दतीची ओपन जिम फक्त (पान ३ वर)

## साखरेच्या दरवाढीवरून ॲड.प्रकाश आंबेडकर आक्रमक

### जनतेने लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर आंदोलन करण्याचे आवाहन



**औरंगाबाद** : वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शनिवार, दि.२२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता सुभेदारी गेस्ट हाऊस, औरंगाबाद येथे महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी संबोधित केले.

यावेळी त्यांनी देशातील साखरेचे वाढते दर, इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात येणारी साखर व मळी, तसेच आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारवर जोरदार टीका केली.

ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, भारत यापूर्वी साखरेचा सरप्लस देश होता आणि साखर निर्यात केली जात होती. मात्र, सरकारच्या नियोजनाअभावी रॉ शुगर आणि मळी मोठ्या प्रमाणात इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात आली आहे. या कारणामुळे यावर्षी भारताला मोठ्या प्रमाणात साखर आयात करण्याची वेळ आली असून, (पान ३ वर)



# संपादकीय...

## अंगणवाडीसेविका रेशमा पारधी यांचा मुख्यमंत्र्यांनी विशेष सत्कार करावा

घोडेगाव, चास ठाकरवाडी (ता.आंबेगाव) ग्रामपंचायत हद्दीतील नंबरवाडी अंगणवाडी केंद्राच्या अंगणवाडी सेविका रेशमा शिवाजी पारधी यांनी अंगणवाडीतील निकृष्ट दर्जाच्या पोषण आहाराचा मुद्दा सोशल मीडीयावर व्हिडीओव्दारे मांडल्याप्रकरणी करण्यात आलेले निलंबन अखेर मागे घेण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वीरधवल जगदाळे यांनी पारधी यांचे निलंबन रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, निकृष्ट पोषण आहार प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. नंबरवाडी अंगणवाडी केंद्रात अपलब्ध झालेला पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याचा आरोप करीत रेशमा पारधी यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ प्रसारित केला होता. या व्हिडीओमध्ये चणे व भरडा अनेक शिट्ट्या देऊनही व्यवस्थित शिजत नसल्याचे त्यांनी दाखवून दिले होते. तसेच, हा आहार मुले आवडीने खात नसल्याने त्याऐवजी चांगल्या दर्जाचे धान्य उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली होती. तसेच या सर्व प्रकरणाची चौकशी करावी म्हणून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त श्री.तुकाराम मुंढे यांना विनंती केली होती. पारधी यांनी पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयाने त्यांची कृती शिस्तभंगाच असल्याचे नमूद करीत निलंबनाची कारवाई केली होती. मात्र, निकृष्ट पोषण आहाराचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या अंगणावाडी सेविकेवरच कारवाई केल्याने विविध स्तरांतून प्रशासनाच्या निर्णयाचा निषेध करण्यात आला. पारधी यांचे निलंबन मागे घेऊन त्यांना पुन्हा सेवेत घेण्याची मागणीही जोर धरू लागली होती. याप्रकरणी अंगणवाडी सेविका संघटना, सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन (सीटू) यांच्यासह विविध संघटनांनी प्रशासनाकडे निषेध नोंदविला. सीटूचे कामगार नेते अजित अभ्यंकर, किसान सभेचे डॉ.अमोल वाघमारे, बिरसा ब्रिगेडचे संतोष तिटकारे, अर्जुन काळे, संदीप केवाळे आदींनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद खंडागळे यांची भेट घेऊन या प्रकरणी चर्चा केली. तसेच या निकृष्ट पोषण आहाराबाबत आवाज उठवल्याबद्दल पारधी यांच्यावर करण्यात आलेले निलंबन निषेधार्ह असल्याची भूमिका खा.डॉ.अमोल कोल्हे यांनी व्यक्त केली. अनेक शिट्ट्या देऊनही जे चणे व वाटाणे शिजत नाहीत, ते प्रथम संबंधित अधिकाऱ्यांनी तपासावेत, त्यानंतरच अंगणवाडी सेविकेवर कारवाई करण्याचा विचार करावा, अशी टीका त्यांनी केली. सेविकेवरील कारवाई ऐवजी कंत्राटदारावर, अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. असे ते म्हणाले.

रेशमा पारधी यांचे निलंबन रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. सर्व स्तरांतून वाढत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने अखेर निलंबन मागे घेण्याचा निर्णय घेतला. तसेच, अंगणवाडीतील पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आहाराचा मुद्दा उपस्थित करणाऱ्या सेविकेला दिलासा मिळाला आहे. या सर्व घडामोडीकडे महाराष्ट्र सरकारने आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जातीने लक्ष घालणे गरजेचे आहे. या अंगणवाडी सेविका रेशमा पारधी यांचा विशेष सत्कार करून त्यांना पदोन्नती देणे आवश्यक आहे. म्हणजे प्रशासनातील प्रमाणीकपणे काम करणाऱ्या सेवकांचा आत्मविश्वास वाढेल. आणि या प्रशासनामध्ये चुकीचे कामे करणाऱ्यांची सर्व प्रकरणे बाहेर येतील. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी अंगणवाडी सेविका रेशमा पारधी यांचा विशेष सत्कार केलाच पाहिजे. नाहीतर आज समाजमाध्यमावर आणि रस्त्यावर उतरून जे लोक महाराष्ट्र सरकारच्या विरोधात आग ओकतात याला आळा बसेल. आणि आपली प्रतिमा आणि आपल्या सरकारची प्रतिमा मलिन होणार नाही. म्हणून येवढे केलेच पाहिजे.


**साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक - यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग - सी - २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे - ४११००६ येथून प्रकाशित केले.**

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

**या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

**कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.**

**आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात**
**Email : sangharshachaaawaz22@gmail.com**
**Email : sangharshachaaawaz@rediffmail.com**
**Mob. : 7276871008 / 9665487134**



## सिगोलवाद सुत्त

**मला उपलब्ध वाङ्मयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.**

**जयभीम!**

**उत्तमराव सोनवणे**

**मागील अंकावरून**

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला.

**क्रमश:**

## विमुक्त जमातींचा १८७१ ते २०२६ पर्यंतचा प्रवास : गुन्हेगार ठरवलेल्या जमातींपासून ते नागरिकत्वाच्या शोधापर्यंत

भारताच्या सामाजिक इतिहासातील सर्वांत मोठ्या अन्यायांपैकी एक अन्याय म्हणजे भटक्या, अर्धभटक्या आणि विमुक्त जमातींना ब्रिटिशांनी जन्मतः गुन्हेगार ठरवणे हा होय. १८७१ साली ब्रिटिश सरकारने क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट लागू केला आणि शेकडो जमातींना सामूहिक गुन्हेगार घोषित केले. या कायद्यामुळे लाखो लोकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये हा कायदा रद्द झाला, पण त्यांचा कलंक मात्र संपला नाही. आज २०२६ मध्येही अनेक विमुक्त जमातींना संशयित नागरिक म्हणून जगावे लागते, ही भारतीय लोकशाहीची वेदनादायी वस्तुस्थिती आहे.

### १८७१ : गुन्हेगारीचे कायदेशीर शिक्कामोर्तब

ब्रिटिश राजवटीने स्थिर शेतीप्रधान समाजाला सभ्य मानले, तर भटक्या जीवनपद्धतीकडे संशयाने पाहिले. व्यापारी, पशुपालक, कलावंत, दगडकाम करणारे, वाहतूक करणारे आणि पारंपरिक कौशल्यांवर जगणाऱ्या अनेक जमातींना गुन्हेगार म्हणून नोंदवले गेले. जन्माला आलेले मूलही गुन्हेगार म्हणून सरकारी नोंदीत दाखल होत असे. गाव सोडण्यासाठी पोलिसांची परवानगी आवश्यक असे. ही शिक्षा व्यक्तीला नव्हे तर संपूर्ण समुदायाला होती.

या कायद्याचा उद्देश गुन्हेगारी रोखणे नसून भटक्या समाजावर नियंत्रण ठेवणे हा होता. ब्रिटिश प्रशासनाला कर वसुली, पोलिस नियंत्रण आणि श्रमशक्तीचे व्यवस्थापन सोपे व्हावे म्हणून या जमातींना वसाहतींमध्ये डांबण्यात आले. अनेक ठिकाणी सक्तीची मजुरी घेतली गेली. त्यामुळे हा कायदा केवळ फौजदारी कायदा नव्हता; तो सामाजिक गुलामीचे साधन होता.



लेखक : डॉ. विनायक लष्कर, सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख, समाजशास्त्र विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती. संपर्क क्रमांक : ८८०६८०६३६२

### स्वातंत्र्य आणि अपूर्ण मुक्ती

भारतीय राज्यघटनेने समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेचे अधिकार दिले. त्यामुळे क्रिमिनल ट्राइब्स ॲक्ट राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत ठरत होता. अखेर १९५२ मध्ये हा कायदा रद्द करण्यात आला आणि या समुदायांना विमुक्त घोषित करण्यात आले. परंतु केवळ कायदा रद्द झाला; पुनर्वसन, जमीन, शिक्षण, रोजगार आणि सामाजिक पुनस्थापना यासाठी सर्वंकष कार्यक्रम राबवला गेला नाही.

त्याहून गंभीर बाब म्हणजे अनेक राज्यांनी हॅबिच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट लागू केले. कायद्याची भाषा व्यक्तीपर्यंत मर्यादित असली तरी पोलिसांच्या नजरेत पूर्वीच्या गुन्हेगार जमाती संशयितच राहिल्या. आजही चोरी किंवा इतर गुन्ह्यांच्या तपासात प्रथम संशय या समुदायांवर जातो, असे अनुभव अनेक ठिकाणी ऐकायला मिळतात.

### शिक्षण, आरोग्य आणि उपजीविका

विमुक्त जमातींमधील साक्षरता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. स्थलांतरित जीवनशैली, गरिबी, वस्ती नसणे, शाळांमधील भेदभाव आणि निवासव्यवस्थेचा अभाव यामुळे मुलांचे शिक्षण लवकर खंडित होते. आरोग्याच्या बाबतीत मातामृत्यू, बालकुपोषण, व्यसनाधीनता, असुरक्षित कामे आणि आरोग्यसेवांपर्यंत मर्यादित पोहोच या समस्या गंभीर आहेत.

पारंपरिक व्यवसायांवर आधुनिक बाजारपेठ, यांत्रिकीकरण आणि शहरीकरणाचा परिणाम झाला. दगडकाम, जनावरांचा व्यापार, लोककला, फिरती विक्री, टोपल्या बनवणे यांसारख्या व्यवसायांचे उत्पन्न घटले. परिणामी मोठा समुदाय असंघटित मजुरीकडे ढकलला गेला.

आयोगांनी दाखवलेले वास्तव रेणके आयोग (२००८) आणि इदाते आयोग (२०१८) यांनी विमुक्त, भटक्या आणि अर्धभटक्या जमातींची दारिद्र्य, निरक्षरता, बेघरपण, जमीनविहीनता आणि सामाजिक बहिष्काराची स्थिती स्पष्ट केली. त्यांनी स्वतंत्र धोरण, अचूक जनगणना, शैक्षणिक सुविधा, निवास, आरोग्य आणि उपजीविका कार्यक्रमांची शिफारस केली. परंतु या शिफारशींची अंमलबजावणी मर्यादित राहिली.

### संविधानात स्थान कुठे?

विमुक्त जमातींची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्यांचे स्वतंत्र संवैधानिक स्थान नाही. काही जमाती अनुसूचित जातींमध्ये, काही अनुसूचित जमातींमध्ये, काही इतर मागासवर्गात तर काही राज्यनिहाय स्वतंत्र वर्गात टाकल्या गेल्या. त्यामुळे एकसंध धोरण तयार झाले नाही. जनगणनेतही त्यांची स्वतंत्र नोंद नसल्याने त्यांच्या लोकसंख्येचा आणि वास्तविक स्थितीचा अचूक अंदाज उपलब्ध नाही.

### समकालीन सामाजिक चळवळींची दिशा

महाराष्ट्रासह देशभरातील विमुक्त संघटना आता गुन्हेगार जमाती ही ओळख नाकारून वासाहतिक अन्यायाचे बळी अशी नवी ओळख मांडत आहेत. आरक्षणातील स्वतंत्र हिस्सा, स्वतंत्र संवैधानिक अनुसूची, जमीन हक्क, शिक्षण आणि सन्मान्य नागरिकत्व या मागण्या अधिक तीव्र होत आहेत. या चळवळींनी विमुक्त प्रश्नाला सामाजिक न्यायाच्या राष्ट्रीय चर्चेत आणले आहे.

### समकालीन अनुत्तरीत प्रश्न

आज विमुक्त जमातीसमोर तीन मूलभूत प्रश्न उभे आहेत.

१. कलंकाचा प्रश्न: कायदा रद्द झाला तरी सामाजिक स्मृतीतील गुन्हेगारपण टिकून आहे.

२. अदृश्यतेचा प्रश्न: स्वतंत्र जनगणना नसल्याने धोरणासाठी आवश्यक माहिती उपलब्ध नाही.

३. हक्कांच्या विखुरलेपणाचा प्रश्न: विविध संवैधानिक वर्गांमध्ये विभागणी झाल्याने सामूहिक राजकीय शक्ती कमी पडते.

### भविष्यातील वाटचाल

विमुक्त जमातींसाठी राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र जनगणना, भटक्या लोकांसाठी पोर्टेबल शिधापत्रिका व आरोग्य सुविधा, निवासी शाळा व उच्च शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्ती, जमीन व घरकुल कार्यक्रम, पोलिस नोंदींचे पुनरावलोकन आणि भेदभावविरोधी कायदेशीर यंत्रणा निर्माण करणे अत्यावश्यक आहे. या समुदायांच्या विकासाकडे दानधर्म म्हणून नव्हे तर ऐतिहासिक न्याय म्हणून पाहिले पाहिजे.

### स्वातंत्र्याचा अपूर्ण प्रवास

१८७१ मध्ये ब्रिटिशांनी या जमातींना गुन्हेगार बनवले; १९५२ मध्ये भारताने त्यांना विमुक्त केले; पण २०२६ मध्येही त्यांचा सन्मानपूर्ण नागरिकत्वाचा प्रवास पूर्ण झालेला नाही. स्वातंत्र्याच्या अमृतकाळात भारताने स्वतःला प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. ज्यांना राज्याने कधीकाळी अन्यायाने गुन्हेगार ठरवले, त्यांना आपण खऱ्या अर्थाने समान नागरिक म्हणून स्वीकारले आहे का? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर शोधल्याशिवाय भारतीय लोकशाहीची सामाजिक न्यायाची प्रतिज्ञा पूर्ण होणार नाही.

# छात्रों की गुंज कार्यक्रमाअंतर्गत राहुल गांधी यांचे पुण्यात जल्लोषात भव्य स्वागत







**पुणे :** राहुल गांधी यांचा छात्रों की गुंज हा देशातील चौथा कार्यक्रम पुणे येथे हजारो मुलींच्या साक्षीने मोठया उत्साहात संपन्न झाला. भारतीय जनता पक्षाकडून राहुल गांधी यांचा कार्यक्रम यशस्वी होऊ नये म्हणून अनेक व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमात सहभागी होऊ नये म्हणून मुलींना धमक्या देण्यात आल्या, हिंसक घटना घडवून आणल्या, कार्यक्रमाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला तरीही छात्रों की गुंज कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. भाजपाने राहुल गांधी यांचा धसका घेतला असल्यानेच त्यांच्या कार्यक्रमात अडथळे आणले पण भाजपाच्या नाकावर टिच्चून छात्रों की गुंज कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला.

राहुल गांधी यांचे दुपारी पुण्यात आगमन झाले त्यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, नसीम खान, यशोमती ठाकूर यांच्यासह नेते व पदाधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर संध्याकाळी राहुल गांधी यांनी छात्रों की गुंज कार्यक्रमात मुलींशी संवाद साधला, त्यांचे प्रश्न, समस्या व व्यथा जाणून घेतल्या. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी (RSS) संबंधित लोक मुली आणि स्त्रिया पिंजऱ्यातच बंदिस्त राहाव्यात या मानसिकतेचे आहेत पण असा भारत आपल्याला नको आहे. आपल्याला अशी व्यवस्था हवी आहे जिथे प्रत्येकाशी आदराने वागले जाईल. महिलांना दडपून ठेवण्याची मानसिकता 'मनुस्मृती'तून आली आहे आणि आज आपला लढा याच मानसिकतेविरुद्ध आहे, असा घणाघाती हल्लाबोल लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुण्याच्या छात्रों की गुंज कार्यक्रमात केला.

राहुल गांधी यांनी यावेळी देशातील महिलांच्या स्थिती बद्दल भाष्य करत त्यांचे हक्क कसे नाकारले जात आहेत ते सांगितले. ते म्हणाले की, हजारो वर्षापासून देशात महिलांना त्यांचे हक्क व अधिकार नाकारण्यात आले, मनुस्मृती महिलांना स्वतंत्र असू नये असे म्हणते पण महिलांना स्वातंत्र्य दिले पाहिजे, त्यातच मोठी ताकद आहे. महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःची ओळख निर्माण केली पाहिजे. मुलीचे वडील, भाऊ, पती किंवा मुलगा यांच्याशी नाते असू शकते, पण त्या त्यांची मालमत्ता नाहीत, त्या स्वतःच्या आहेत असे प्रतिपादन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केले आहे.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, समाजात महिलांना प्रगती करण्यापासून रोखण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला जातो. या हिंसाचाराचे तीन प्रकार आहेत: शारीरिक हिंसाचार-दरवर्षी ४.५ लाख स्त्री-भ्रूणहत्या केल्या जातात. ८०% महिलांना छळाचा सामना करावा लागतो. २९% महिला शारीरिक हिंसाचाराला बळी पडतात. ६% महिलांवर बलात्कार होतो. संधी नाकारणारा हिंसाचार - सुरक्षिततेच्या नावाखाली ५०% महिलांना शिक्षण किंवा रोजगाराच्या संधी नाकारल्या जातात. आर्थिक हिंसाचार- सुरक्षित प्रवासाच्या नावाखाली दरवर्षी अतिरिक्त १७,५०० रुपयांचा खर्च करावा लागतो. देशात महिलांवर वेगवेगळ्या प्रकारे नियंत्रण ठेवले जाते. हालचाल/वावरण्याचे स्वातंत्र्य: ६०% महिला एकट्या घराबाहेर जाऊ शकत नाहीत. निर्णय स्वातंत्र्य/निवड: ४५% महिलांना लग्न किंवा घरगुती जबाबदाऱ्यांमुळे शिक्षण किंवा काम सोडावे लागते. आर्थिक अधिकार: केवळ ८% महिलांकडे जमिनीची मालकी हक्क आहेत. आपल्या देशात अनादर किंवा अवमानाची विविध रूपे दिसून येतात: सामाजिक बदनामीच्या भीतीमुळे लैंगिक हिंसाचाराच्या ९९% घटनांची नोंदच केली जात नाही. ८४% महिलांना नोकरी करण्यासाठी आपल्या कुटुंबाची परवानगी घ्यावी लागते. पुरुषांच्या तुलनेत महिलांचे उत्पन्न २५% कमी असते आणि त्यांना सहजपणे पदोन्नती मिळत नाही.

जेव्हा मी पुरुषांशी बोलतो, तेव्हा मला असे आढळते की स्त्रियांना अनेकदा केवळ तीनच चौकटींत पाहिले जाते : मुलगी, पत्नी किंवा आई. यापैकी कोणत्याही भूमिकेत काहीही गैर नाही पण या तुमच्या एकमेव ओळखी असू शकत नाहीत. स्त्रिया या व्यावसायिक, खेळाडू, नेत्या, निर्मात्या, उद्योजिका अशा अनेक भूमिका निभावणाऱ्या असतात. तरीही, अनेकदा त्यांची ओळख केवळ एखाद्या पुरुषाशी असलेल्या नात्यावरूनच ठरवली जाते. असे राहुल गांधी यांनी सांगितले.

राहुल गांधी पुण्यात येताच काँग्रेस पक्षातील सर्व नेत्यांनी त्यांचे स्वागत करत सत्कार केले.

## नगरसेवक अमोल बालवडकर आणि सुहास टिंगरे यांनी दिलेल्या ठरावाची...

**(पान १ वरून)** ४,००,०००/- रूपये मध्ये खडकवासला मतदार संघाचे आमदार श्री.भिमराव अण्णा तापकीर यांनी सन २०२३-२०२४ मध्ये खडकवासला विधानसभा-मानाजी नगर (साद) नऱ्हे येथे ओपन जिम बसविली आहे. यामुळे भ्रष्टाचार किती मोठ्या प्रमाणात आणि कोणत्या स्तरावर होतो आहे. हे पाहून मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसते की, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि या मतदार संघाचे आमदार श्री.चंद्रकांतदादा पाटील यांच्या कार्यकाळात करण्यात आलेल्या विकास कामाची वर्षनिहाय माहिती मागविण्यात आली पाहिजे. असे सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसत आहे.

जर भ्रष्टाचार झाला नाही आणि तो सिध्द करून विकासनिधी शून्य केला असता; तर यांच्याविरोधाला कोणीही जुमानले नसते; पण सिध्द न करताच अमोल बालवडकर आणि सुहास टिंगरे यांच्या प्रभागाचा विकास निधी शून्य करून पुणे शहरातील नागरिकांचे लक्ष मोठ्या प्रमाणात कोथरूड मतदार संघात चंद्रकांतदादा पाटील यांनी केलेल्या कामाकडे लक्ष लागले आहे हे मात्र नक्की. तसे पाहता नगरसेवक अमोल बालवडकर यांनी ठराव काय केला होता. तर तो असा कोथरूड विधानसभा मतदारसंघात पुणे जिल्हा नियोजन समिती, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम तसेच इतर उपलब्ध विकासनिधीतून पुणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या पुढील विविध विकासकामांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी, उपलब्ध कागदपत्रे व निदर्शनास आलेल्या कथित अनियमिततेच्या अनुषंगाने स्वतंत्र, निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी.

१) कोथरूड मतदार संघातील पुणे मनपाचे कै.बलभीम कोकाटे जलतरण तलाव येथे युव्ही प्रणाली यंत्रणा बसविणे, रक्कम रू.९,५३,९००/-, २) कोथरूड मतदार संघातील पुणे मनपाचे कै.धनंजय ताम्हाणे जलतरण तलाव बाणेर येथे युव्ही प्रणाली यंत्रणा बसविणे, रक्कम रू.९,५३,९००/-, ३) कोथरूड मतदार संघातील पुणे मनपाचे नाथुजी मेंगडे जलतरण तलाव कर्वेनगर येथे युव्ही प्रणाली यंत्रणा बसविणे, रक्कम रू.९,५३,९००/-, ४) कोथरूड मतदार संघातील पुणे मनपाचे स्वामी विवेकानंद जलतरण तलाव बावधन येथे युव्ही प्रणाली यंत्रणा बसविणे, रक्कम रू.९,५३,९००/-, एकूण वितरीत झालेल्या निधीची रक्कम रूपये-३८,१५,६००/-

या चौकशीमध्ये विशेषत: खालील बाबींचा समावेश करण्यात यावा

१) मंजूर प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया आणि कंत्राट वाटपाची पडताळणी, २) प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामाची गुणवत्ता, प्रमाण व मंजूर आराखड्याशी सुसंगता तपासणे, ३) करण्यात आलेल्या देयकांची, मोजमाप पुस्तिका, बिले, कार्यादेश व इतर अभिलेखांची तपासणी, ४) आवश्यक असल्यास संबंधित कामांचे स्वतंत्र तांत्रिक परीक्षण लेखापरिक्षण करणे, ५) आर्थिक अथवा प्रशासकीय अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार अथवा इतर जबाबदार व्यक्तींवर लागू असलेल्या कायद्यांनुसार योग्य ती शिस्तभंगाची, प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करणे. तरी पुणे जिल्हा नियोजन समिती व आमदार स्थानिक विकास कार्यक्रम कोथरूड विधानसभा तसेच इतर विकासनिधीतून पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या या विकासकामांची सखोल चौकशी व विशेष लेखापरिक्षण करून सदर प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व कालबध्द चौकशी करून तिचा अहवाल स्थायी समितीसमोर निश्चित कालावधीत सादर करण्यात यावा म्हणून सूचक-अमोल बालवडकर तर अनुमोदक-सुहास टिंगरे होते. या आणि कोथरूड मतदार संघातील विकासकामे मोठ्या प्रमाणात बाहेर येणार? या निमित्ताने असे दिसून येत आहे. तसे पाहता या पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे राज्याच्या सत्तेत सहभागी आहेत. हा विषय शेवटपर्यंत घेवून जाणार की, आपसात वाद मिटवून हे प्रकरण शांत करणार हे लवकरच समोर येईल. पण पुणेकर नागरिक शांत बसणार का? हा प्रश्न आहे.

## साखरेच्या दरवाढीवरून ॲड.प्रकाश आंबेडकर...

**(पान १ वरून)** त्याचा थेट परिणाम साखरेच्या किमतीवर होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आज साखरेचा भाव ८० रुपये आहे. येत्या १०-१२ दिवसांत तो १०० रुपयांवर जाऊ शकतो. मोदक आता गोड लागण्याऐवजी कडू लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे ड. आंबेडकर म्हणाले. नवरात्र, दिवाळी यांसारखे सण जवळ येत असताना साखरेचे दर वाढल्यामुळे सर्वसामान्यांच्या सणांचा गोडवा हिरावला जात असल्याचेही त्यांनी म्हटले.

पुढे ते म्हणाले की, महाराष्ट्र देशातील साखर उत्पादनात मोठा वाटा उचलतो. या पार्श्वभूमीवर साखरेच्या दरवाढीचा फायदा काही साखर व्यावसायिकांकडून घेतला जात असल्याचा आरोपही ड. आंबेडकर यांनी केला. रॉ शुगर आणि मळी इथेनॉल निर्मितीकडे वळवल्यामुळे देशात साखरेचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच दरवाढीवर नियंत्रण आणण्यासाठी जनतेने आंदोलनाची भूमिका स्वीकारण्याचे आवाहन करत ड. आंबेडकर म्हणाले की, सत्तेत असलेल्या तसेच सत्तेत जाण्याच्या तयारीत असलेल्या पक्षांच्या जिल्हाध्यक्ष, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, नगरपालिका व महानगरपालिका सदस्य, आमदार आणि खासदार यांच्या घरांसमोर जनतेने निदर्शने केली पाहिजेत.

जनतेने हे आंदोलन आपल्या हातात घेतले पाहिजे. जनता रस्त्यावर उतरली तरच साखरेतील गोडवा कायम राहील; अन्यथा कडूपणा सर्वांनाच सहन करावा लागेल, असे ते म्हणाले. हे व्यापक आंदोलन आहे. जनतेने सुरुवात केली तर आम्ही त्यांच्यासोबत राहू, अशी भूमिका ड. आंबेडकर यांनी स्पष्ट केली. सरकारच्या धोरणांविरोधात जनतेने तिरंगा घेऊन लोकप्रतिनिधींच्या घरांसमोर आंदोलन करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सरकारच्या कारभारावर टीका करताना ड. आंबेडकर यांनी सरकारला डिक्टेटरचे सरकार असे संबोधले. डिक्टेटर कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा नेत्याला घाबरत नाही; तो जनतेला घाबरतो. जंतरमंतरच्या आंदोलनावरून हे दिसून आले आहे, असे ते म्हणाले. कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी जनतेची असल्याचे सांगत त्यांनी पोलिसांबाबतही बोलले. ते म्हणाले की, मालक ही जनता आहे आणि मालक ही जनता असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था लागू करण्याची जबाबदारी ही जनतेची आहे, पोलिसांची नाही. पोलीस हा जनतेचा नोकर आहे. याशिवाय मतदार यादी आणि मोठ्या प्रमाणावर मतदार वगळले जाण्याच्या मुद्द्यावरही ड. आंबेडकर यांनी भाष्य केले. महाराष्ट्रातील आकडेवारीचा संदर्भ देत मोठ्या संख्येने मतदार वगळले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सावित्रीबाईंच्या विचारांची ज्योत पिढ्यान्पिढ्या तेवत राहील : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्ञानशिल्पाचे उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण

**पुणे :** सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची आणि परिवर्तनवादी विचारांची साक्ष देणाऱ्या २८ ज्ञानशिल्पांचे लोकार्पण करण्याचे भाग्य लाभणे हा माझ्यासाठी मनस्वी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. या ज्ञानशिल्पांतून शिक्षण, मानवता, समता, सामाजिक न्याय आणि परिवर्तनाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित ज्ञानशिल्प लोकार्पण समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, कुलसचिव प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, विविध व्यवस्थापन मंडळांचे सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. त्यांनी केवळ एका पिढीला शिक्षण दिले नाही, तर पुढील अनेक पिढ्यांसाठी परिवर्तनाची वाट निर्माण केली.

सावित्रीबाईंच्या जीवनकार्याचे विविध पैलू या ज्ञानशिल्पांतून मांडण्यात आले आहेत. पुण्यातील भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा सुरू करणे, पहिल्या महिला शिक्षिका म्हणून कार्य करणे, बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, कवयित्री व साहित्यिक म्हणून योगदान, सत्यशोधक चळवळीत सहभाग आणि प्लेगच्या महामारीत रुग्णांची सेवा करणे, अशा अनेक कार्यांचा यात समावेश आहे. या ज्ञानशिल्पांमध्ये आरसा लावून त्याखाली 'मी कोण?' असा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्या आरशात पाहताना मलाही हा प्रश्न पडला. पुढच्या क्षणी जाणवले की मी सावित्रीची लेक आहे. एका छोट्या गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या माझ्यासारख्या मुलीला आज महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली, यामागे सावित्रीबाईंच्या कार्याची प्रेरणा आहे. त्याबद्दल मी सदैव ऋणी आहे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या.

महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी काम करताना मोठा विरोध आणि त्रास सहन केला. मात्र, त्यांनी आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. सावित्रीबाईंनी पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज देशभर प्रकाश देत असून, त्याच संघर्षाच्या बळावर महिला आज विज्ञान, शिक्षण, प्रशासन, उद्योग, क्रीडा, संरक्षण आणि शेतीसह प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करत आहेत, असे पवार यांनी नमूद केले.

पुण्यातील ऐतिहासिक भिडेवाड्यात फुले दाम्पत्याचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या कामासाठी अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. आवश्यक परवानग्या मिळवून हे काम पुढे नेण्यासाठी त्यांनी विशेष पाठपुरावा केला, अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितली.

महाराष्ट्राला जिजाऊ माँसाहेब, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा महान वारसा लाभला आहे. जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना संस्कार दिले, सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, तर अहिल्यादेवींनी लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक मुलगी ही जिजाऊ, सावित्री आणि अहिल्येची लेक आहे, असे त्यांनी सांगितले.

महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणासाठी राज्य सरकारकडून 'लेक लाडकी', 'लाडकी बहीण', 'पिंक रिक्षा', 'लखपती दीदी' यांसारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. फुले दाम्पत्याला भारतरत्न मिळावा, ही महाराष्ट्राची भावना आहे. त्यांच्या महान कार्याचा योग्य सन्मान व्हावा, यासाठी महाराष्ट्र विधानसभेने केंद्र सरकारकडे एकमताने शिफारस केली असल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित ज्ञानशिल्पांच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनाचा, शैक्षणिक कार्याचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा परिचय नव्या पिढीला होणार आहे. ज्ञानशिल्पांमधून सावित्रीबाईंच्या जीवनातील विविध पैलू साकारण्यात आले आहेत. मुलींच्या शिक्षणासाठी सुरू केलेली पहिली शाळा, प्रौढ शिक्षणाचा आग्रह, सत्यशोधक चळवळीतील सहभाग, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी केलेले कार्य, समाजप्रबोधन, साहित्यिक योगदान, महात्मा फुले यांच्यासोबतचे सहजीवन आणि प्लेगच्या साथीच्या काळात केलेली लोकसेवा अशा अनेक प्रसंगांचे दर्शन या ज्ञानशिल्पांतून घडते. ही ज्ञानशिल्पे केवळ भिंतीवरील चित्रे नसून इतिहास आणि वर्तमानाचा संवाद घडविणारे माध्यम आहेत. विद्यापीठ परिसरात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला या ज्ञानशिल्पांतून सावित्रीबाईंच्या विचारांची ओळख होईल आणि शिक्षणाचा उपयोग समाजाच्या परिवर्तनासाठी करण्याची प्रेरणा मिळेल.

सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित ज्ञानशिल्पांची निर्मिती हा केवळ कलात्मक उपक्रम नसून त्यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. या ज्ञानशिल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सावित्रीबाईंच्या संघर्षाची, सामाजिक बांधिलकीची आणि शिक्षणविषयक विचारांची प्रेरणा मिळेल, असे आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे म्हणाले. सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी आवश्यक असलेल्या विविध परवानग्यांचा प्रश्नही मार्गी लावण्यात आला. या कामात तत्कालीन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विशेष पाठपुरावा केला, अशी आठवण पांडे यांनी यावेळी सांगितली.

### ज्ञानशिल्पांची उपमुख्यमंत्र्यांकडून पाहणी

लोकार्पणानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विद्यापीठ परिसरातील सर्व २८ ज्ञानशिल्पांची पाहणी केली. प्रत्येक शिल्पाची माहिती जाणून घेत त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचे विविध पैलू समजून घेतले. या ज्ञानशिल्पांची संकल्पना, त्यामागील उद्देश आणि निर्मितीत सहभागी झालेल्या सर्वांचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी शिल्पकार नवीन शेगमवार, आर्किटेक्ट धनंजय सालकर तसेच यासाठी समितीच्या माध्यमातून कामगिरी केलेले प्रा. डॉ. संजय चाकणे यांचाही विशेष गौरव करण्यात आला. आभार कुलसचिव प्रफुल्ल पवार यांनी मानले.

# कोट्यवधी रुपये खर्च करूनही रस्त्याची काही महिन्यांतच दुरवस्था; संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी - सागर खांदवे



### खांदवे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या प्रमुख मागण्या केल्या आहेत

* रस्त्याची स्वतंत्र व निष्पक्ष तांत्रिक पथकामार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी.
* रस्त्याच्या विविध थरांची जाडी, मजबुती व गुणवत्ता यांची स्वतंत्र तपासणी करण्यात यावी.
* वापरण्यात आलेले डांबर, खडी व इतर साहित्याचे प्रमाण व गुणवत्ता यांची शासकीय अभिलेखांशी पडताळणी करण्यात यावी.
* रस्त्याचे प्रत्यक्ष मोजमाप, वापरलेल्या साहित्याचे प्रमाण, मोजमाप पुस्तिका व अदा केलेली देयके यांची परस्पर पडताळणी करण्यात यावी.
* मंजूर कामाच्या प्रमाणात आणि प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामात फरक असल्यास त्याची चौकशी करण्यात यावी.
* रस्त्यावरील पाणी निचरा व्यवस्थेची तपासणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात.
* कामाच्या गुणवत्तेत अनियमितता आढळल्यास संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकारी/अभियंता यांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई करण्यात यावी.
* कामाचा दर्जा निकषांनुसार नसल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित ठेकेदाराकडून नियमानुसार दुरुस्तीचे काम करून घेण्यात यावे.
* चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्याचा तांत्रिक चौकशी अहवाल व करण्यात आलेल्या कारवाईची लेखी माहिती देण्यात यावी.

**पुणे :** लोहेगाव येथील डी.वाय.पाटील कॉलेज रस्ता (तेली आर-४४४) या रस्त्याच्या सुधारणा कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, या कामाची स्वतंत्र व निष्पक्ष तांत्रिक चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी माहिती सेवा समितीचे सागर शिवाजी खांदवे यांनी केली आहे.

सदर रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आले आहे. माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त कागदपत्रांचा अभ्यास केल्यानंतर तसेच दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी केल्यानंतर कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर बाबी निदर्शनास आल्याचे खांदवे यांनी सांगितले.

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान रस्त्याच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात खडी उखडलेली, पृष्ठभागाची झीज झालेली, अनेक ठिकाणी रस्ता खराब झालेला तसेच पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य निचरा व्यवस्था नसल्याचे दिसून आले.

सार्वजनिक निधीतून कोट्यवधी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या रस्त्याची अल्पावधीतच अशी अवस्था होणे ही गंभीर बाब आहे. नागरिकांच्या पैशांचा अपव्यय होऊ नये आणि रस्त्याचे काम दर्जेदार व्हावे, यासाठी या प्रकरणाची कोणतीही राजकीय किंवा प्रशासकीय दबावाशिवाय स्वतंत्र तांत्रिक चौकशी झाली पाहिजे. दोष आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका सागर खांदवे यांनी व्यक्त केली.